# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/01/2022 (शनिवार)

(सकाळ)

---

### जबरी चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावरील लोकप्रिय देशी दारूची दुकान, पोटा येथे दिनांक 07/01/2022 चे 20.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अवदेश गुप्तेश्वर शर्मा, वय 42 वर्ष, रा.दहेगाव रंगारी ता. सावेनर जिल्हा नागपूर हा देशी दारू भट्टीचा मॅनेजर असून तो भटटीतील रूममध्ये कॅश मोजून काउंटर मध्ये ठेवून बाजूला बसला असता रूमच्या दरवाज्याची कडी काढून दोन अनोळखी मुले वय अंदाजे 20–25 वर्षे वयोगटातील एकाने अंगात क्रिम रंगाचा शर्ट व दुसरा फुल शर्ट तसेच दोघांनी जिन्स पॅन्ट घातलेले व तोंडावर काळया रंगाचा मॉस्क लावून हातात पिस्टल सदृष्य वस्तू हातात घेवून यातील फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे जवळील रेडमी कंपनीचा मोबाईल किंमत 8,000/– रूपये व काउंटर मधील 19,000/– रूपये नगद तसेच डिव्हिआर बॉक्स किंमत 4,000/– रूपये असा एकुण 31,000/– रूपयाचा मुददेमाल हिसकावून घेवून जात असतांना फिर्यादीने अटकाव करण्याचा प्रयत्न केला असता यातील एका आरोपीने पिस्टल सदृष्य वस्तू ने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी करून पळून गेले. तेव्हा बाहेरून येणा–या ग्राहकाने तिन मुले मोटारसायकल ने पळून जातांना दिसल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 394, 506, 34 भादंवि. सहकलम 3/25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास प्रितम निमगडे, पोस्टे खापरखेडा मो. क्र. 8999917112 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 30 कि. मी. अंतरावरील मौजा कळमना येथे दिनांक 05/01/2022 चे 21.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण रामदास झोलेकर, वय 40 वर्ष, रा. दापोरी ता. मोर्शी, जि. अमरावती, ह.मु. विज्ञान नगर मानेवाडा नागपुर हे एमएसईबी कंपनीचे कर्मचारी असुन एमएसईबी कंपनीचे ईलेक्ट्रीक ॲल्युमिनीयम चे तार भुषण नर्सरी येथे ठेवले होते. त्यादरम्यान आरोपी क्र. 1. सचिन वानखेडे व 2. किरण शेंडे दोन्ही रा. कळमना जि. नागपूर यांनी एमएसईबी कंपनीचे ईलेक्ट्रीक ॲल्युमिनीयम चे तार गुंडाळुन चोरी करण्याचा बेतात असतांना फिर्यादी व गावकरी घटनास्थळावर आल्यामुळे यातील दोन्ही आरोपीतांनी त्यांच्या स्वताच्या मालकीची एमएच– 31/बीडब्लु–710 क्रमांकाच्या मोटरसायकला सोडुन पळुन गेले. तसेच भुषण नर्सरी येथे गच्छीवर ठेवलेले जुने 15 लोखंडी ॲंगल अंदाजे वजन 200 किग्र अंदाजे किं 15,000/–रू. चा माल चोरी गेलेला असुन या दोघांनीच ही चोरी केली असावी असा संशय असल्याने फिर्यादीच्या रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी मो.नं. 7775811619 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर